**तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी § 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@gmail.com Internet: http://www.dtemaharashtra.gov.in

<u>अधिसूचना</u>

क्रमांक : २अ/एडीएम/प्रमाणपत्रे/२०१६/ ४३३
दिनांक : 30 MAR 2016

विषय : शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील व्यावसायिक पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेली प्रमाणपत्रे प्राप्त करुन घेण्याबाबत...

महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ , दिनांक १७.८.२०१५ नुसार महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानित खाजगी व्यावसायीक शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाचे व शुल्काचे विनियमन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित तदनुषंगिक बाबीसाठी " प्रवेश नियामक प्राधिकरण " आणि " शुल्क नियामक प्राधिकरण " या दोन प्राधिकरणांची स्थापना करण्यात आलेली आहे. तसेच प्रवेश नियामक प्राधिकरणांतर्गत राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष निर्माण केलेला आहे. या अधिनियमानुसार तंत्रशिक्षणातील व्यावसायिक पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठीचे प्रवेश नियम व प्रवेश पात्रता शासनाने राजपत्राद्वारे दिनांक ११.३.२०१६ रोजी प्रसिध्द केले आहेत.

शासकीय व अशासकीय अनुदानीत संस्थांमधील व्यावसायिक पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीसुध्दा सदर प्रवेश नियम लागू करण्याबाबत शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक टीईएम-२०१६/प्र.क्र.५३६/तांशि-४,दिनांक १५.३.२०१६ निर्गमित केलेला आहे.

उपरोक्त अधिनियम, सर्व राजपत्रे व शासन निर्णय संचालनालयाच्या www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावरही उपलब्ध आहेत.

सदर प्रवेश नियमावली व प्रवेश अर्हतेनुसार पात्र असलेल्या व शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये तंत्रशिक्षणातील व्यावसायिक अभ्यासक्रमांपैकी खालील

- प्रथम वर्ष एम.ई./एम.टेक., एम.फार्म., एम.आर्किटेक्चर, एम.एचएमसीटी , एमबीए/एमएमएस, पदव्युत्तर पदवी तसेच प्रथम वर्ष एमसीए व थेट द्वितीय वर्ष एमसीए पदव्युत्तर पदवी (Post Graduate Degree)
- प्रथम वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र,फार्म.डी., वास्तुशास्त्र , हॉटेल मॅनेजमेंट ॲंड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदवी (Degree)
- थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी (Degree)
- प्रथम वर्ष पोस्ट एचएससी अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट ॲंड कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदविका (Diploma)
- प्रथम वर्ष पोस्ट एसएससी अभियांत्रिकी पदविका (Diploma)
- थेट द्वितीय वर्ष पोस्ट एसएससी अभियांत्रिकी पदविका(Diploma)

अभ्यासक्रमास केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (CAP) प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या सर्व उमेदवारांना सूचित करण्यात येते की, संबंधित उमेदवारांनी खालील प्रमाणपत्रे प्राप्त करून घ्यावी.

१) **जात प्रमाणपत्र** (Caste Certificate)

सामाजिक मागास प्रवर्गातून प्रवेश घेऊ इच्छिणारे <u>महाराष्ट्र राज्यातील</u> उमेदवारांनी महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी सदर जात महाराष्ट्र शासनाच्या मागासवर्गीयांच्या अधिकृत यादीमध्ये मोडत असल्याचे संबंधित विद्यार्थ्याच्या नावाने दिलेले जात प्रमाणपत्र आवश्यक आहे.

२) **नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र** : (Non-Creamy Layer Certificate) :

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व्यतिरिक्त उर्वरीत सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांना प्रगत व उन्नत गटाचे (नॉन क्रिमी लेअरचे) तत्व लागू केलेले आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या

संबंधित प्राधिकाऱ्यांनी दिलेले व दि.३१/०३/२०१७ पर्यंत वैधता असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate) आवश्यक आहे.

**३) जात/जमात वैधता प्रमाणपत्र** (Caste/Tribe Validity Certificate)

सामाजिक मागास प्रवर्गातील उमेदवारांना राखीव जागांवर प्रवेश घ्यावयाचा असल्यास महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी संबंधित विद्यार्थ्याच्या नावे दिलेले जात/जमात वैधता प्रमाणपत्र पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी सादर करणे अनिवार्य आहे.तथापि पदविका अभ्यासक्रमासाठी जात/जमात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य नाही. मात्र अन्य आर्थिक सवलतीसाठी संबंधित विभागाच्या धोरणानुसार सदर प्रमाणपत्र आवश्यक आहे किंवा कसे याची खात्री करून उमेदवारांनी स्वत: निर्णय घ्यावा.

**४) अधिवास प्रमाणपत्राबाबत** (Domicile Certificate)

उपरोक्त प्रवेश नियमांनुसार प्रवेशासाठी अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यास सदर उमेदवारांनी महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिका-यांनी विद्यार्थ्याच्या नावे दिलेले किंवा त्याच्या आई/वडिलांच्या नावाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**५) आधार कार्ड**

उमेदवाराने भारत सरकारच्या वतीने देण्यात येणारा आधार कार्ड नंबर प्राप्त करून घ्यावा. शासनाच्या विवीध योजना, शिष्यवृत्ती, इत्यादीसाठी आधारकार्ड क्रमांक अभिप्रेत आहे.

**६) उत्पन्नाचे प्रमाणपत्र** (Income Certificate)

उमेदवारांना AICTE च्या Tution Fee Waiver Scheme अंतर्गत प्रवेश घ्यावयाचा असल्यास उमेदवाराच्या कुटुंबाचे आर्थिक वर्ष २०१५-१६ मधील एकत्रित वार्षिक उत्पन्न रूपये ६.०० लाखपर्यंत असल्याबाबतचे महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिका-यांनी दिलेले प्रमाणपत्र आवश्यक आहे.

जे उमेदवार Person with Disability /Defence/अल्पसंख्यांक इ.संवर्गातून प्रवेश घेऊ इच्छित असतील त्यांनी संबंधित प्रमाणपत्रे/कागदपत्रे तयार ठेवावीत.

**प्रवेश अर्जाच्या स्वीकृतीच्यावेळी जर आवश्यक प्रमाणपत्रे/कागदपत्रे संबंधित उमेदवार सादर करु शकला नाही, तर त्यास संबंधित प्रवर्गाच्या आरक्षणाचा किंवा प्रवेश नियमातील तरतूदींचा फायदा मिळणार नाही व त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील, याची नोंद घ्यावी.**

प्रवेशाबाबतची माहिती संबंधित प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर आणि या संचालनालयाच्या www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. अधिक माहितीसाठी या संचालनालयाच्या विभागीय कार्यालयांकडेही संपर्क साधता येईल.

| | |
|---|---|
| मुंबई-- ०२२-२६४७४८९२ , २६४७१६१९ | औरंगाबाद--०२४०-२३३४२१६,२३३४७६९ |
| पुणे-- ०२०-२५६५६२३४, २५६७८९७३ | अमरावती-- ०७२१-२५७३०२७ |
| नाशिक- ०२५३-२४६१४७९, २४६०११४ | नागपूर-- ०७१२-२५६५१४३,२५४९३८७ |

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

D:\Budage\२०१६-१७\General Correspondence\notification for certificate march २०१६.docx